पुण्य नगरी

# 'रवळनाथ'चे काळापुढे पाऊल : जिल्हाधिकारी



गडहिंग्लज : रवळनाथ संस्था समूह सदिच्छा भेटीप्रसंगी अमोल येडगे यांचा सत्कार करताना एम. एल. चौगुले. उपस्थित ऋषिकेत शेळके, एकनाथ काळबांडे व अन्य.

गडहिंग्लज : प्रतिनिधी

घरकुल उभारणीसाठी सध्या केंद्र व राज्य शासनस्तरावर अनेक योजना सुरू आहेत; परंतु १९९६ मध्येच हा विचार घेऊन आजपर्यंत चार हजार घरांची उभारणी श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने केली आहे. त्यामुळे रवळनाथ संस्थेचे काळाच्या पुढे पाऊल आहे, असे गौरवोद्‌गार जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काढले.

येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी, ज्ञानदीप प्रबोधिनी संचालित, झेप ॲकॅडमी या संस्थांना त्यांनी सदिच्छा भेट दिली, यावेळी ते बोलत होते. प्रांताधिकारी एकनाथ काळबांडे, तहसीलदार ऋषिकेत शेळके, आजरा तहसीलदार राजेश चव्हाण, रवळनाथचे संस्थापक एम. एल. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, विजय आरबोळे, महेश मजती, मनोहर पुजारी, मीना रिंगणे, रेखा पोतदार, सचिव संदीप कागवाडे, गौरी बेळगुद्री, डी. के. मायदेव यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

Kolhapur Edition
Sep 23, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com